**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## स्टार्टअपसाठी विद्यार्थ्यांनी संशोधन प्रस्ताव सादर करावेत - डॉ. सारडा
## विद्यापीठात स्टार्टअप इंडिया २०१८ प्रदर्शनीत अद्ययावत मॉडेल्सचे सादरीकरण
## कुलगुरुंचा उल्लेखनीय पुढाकार

अमरावती.

विद्यार्थ्यांनी तयार केलेले संशोधनपर प्रोजेक्ट स्टार्टअपच्या माध्यमातून पुढे येण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर संशोधन प्रस्ताव सादर करावेत, असे प्रतिपादन आय.आय.टी. पवई येथील संगणकशास्त्र व अभियांत्रिकी विभागाचे प्रो.डॉ.एन.एल. सारडा यांनी केले. विद्यापीठाच्यावतीने स्टार्टअप इंडिया २०१८ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी दृकश्राव्य सभागृहात उद्‌घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, सोमय्या विद्या विहार, मुंबई येथील इनोव्हेशन कॅटॅलिस्ट आणि बायोरिल्डीच्या प्रमुख कु. भावना पंड्या, ह.व्या.प्र.मं. अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे, आयोजक सचिव डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. वर्षा नाठार उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ. सारडा म्हणाले, विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संशोधनाला स्टार्टअपच्या माध्यमातून चालना मिळावी, यासाठी विद्यापीठाने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. आय.आय.टी. पवईत संशोधनाच्यादृष्टीने होत असलेल्या कार्याची माहिती देवून पी.पी.टी. प्रेसेन्टेशनद्वारे संशोधन प्रोजेक्टवर विद्यार्थ्यांनी कसे काम करावे, यंग इंजिनिअर्स म्हणून स्वतःला तयार करतांना विद्यार्थ्यांनी इंडस्ट्री ग्रेड प्रॉडक्शनकरीता कशा प्रकारचे प्रोजेक्टस् तयार करावे, त्याचा स्टार्टअप, मार्केटींग, आर.एन.डी., टेक्नॉलॉजी, डेमॉनस्ट्रेटर्स, इनक्युबेशन सेंटर्स, वित्तीय पुरवठा, टीम मॅनेजमेन्ट आदींबाबत सविस्तर माहिती दिली.

पुढे म्हणाले, स्टार्टअपसाठी सुरुवातीला अनेक आव्हाने विद्यार्थ्यांसमोर असतात. अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट महत्वाचा असतो, तो विशेषतः टेक्नॉलॉजीवर आधारित असायला हवा. आपल्या प्रोजेक्टचे स्टार्टअपमध्ये कसे रुपांतर करावे, त्याच्या गतीविधी यावर त्यांनी सविस्तर माहिती दिली. ओला आणि हाऊसिंग डॉट कॉम या यशस्वी उद्योगांविषयी सुद्धा त्यांनी सांगितले.

कु. भावना पंड्या म्हणाल्या, इनक्युबेशन आणि इनोव्हेशन सेंटर महाराष्ट्र शासनाने मुंबईला सुरु केले आहे. विद्यार्थ्यांनी आपले प्रोजेक्टस् इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून निश्चित केले पाहिजे आणि त्यानंतर त्याला स्टार्टअप करता येईल. विद्यार्थ्यांनी रोजगार घेणारे न बनता देणारे व्हावे, यासाठी स्टार्टअप इंडिया हा उपक्रम मैलाचा दगड ठरला आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, भारताचे पंतप्रधान ना.श्री. नरेंद्र मोदी यांनी मेक इन इंडिया हा प्रोजेक्ट सुरु केला आहे. अभ्यासासोबत विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना मिळण्याची फार गरज आहे. त्यांचे प्रोजेक्टस् इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून निश्चित व्हावे, यासाठी महाराष्ट्रात हे केंद्र सुरु आहे, विद्यापीठातसुद्धा अशा प्रकारचे केंद्र सुरु करण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रदर्शनीमध्ये विविध संशोधनपर मॉडेल्स विद्यार्थ्यांकडून सादर होणार आहे. स्टार्टअपच्या निमित्ताने उपक्रमांच्या माध्यमातून उचललेले पाऊल फलदायी ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे. उद्योगानुरुप मनुष्यबळ निर्मितीला बळ मिळावे, यासाठी अमरावती इंडस्ट्रीयल असोसिएशन, इंडो जर्मन, बॉस आदींशी करार केला आहे. विद्यापीठात सस्टेनेबल

डेव्हलपमेन्ट, जिऑलॉजिकल सेंटर व आदी सुरु करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. देशाच्या विकासासाठी आणि सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी कौशल्य विकास महत्वाचा असून विद्यार्थ्यांची उद्योजक होण्याची मानसिकता व्हावी, यासाठी स्टार्टअप इंडिया महत्वाचा उपक्रम आहे.

## स्टार्टअप इंडिया प्रदर्शनीचे उद्‌घाटन

कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर व डॉ.एन.एल. सारडा यांचे शुभहस्ते भौतिकशास्त्र विभागात आयोजित स्टार्टअप इंडिया २०१८ प्रदर्शनीचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, सोमय्या विद्या विहार, मुंबई येथील इनोव्हेशन कॅटॅलिस्ट आणि बायोरिल्डीच्या प्रमुख कु. भावना पंड्या, भौतिकशास्त्र विगाप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, आयोजक सचिव डॉ. प्रशांत ठाकरे, ह.व्या.प्र.मं. अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे, विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी स्पीड कंट्रोल, फायर डिटेक्शन, ब्रेक फेल्युअर डिटेक्शन, स्मार्ट पार्कींग, पॉवर सेव्हींग इन ऑफिसेस, इंडस्ट्री ऑटोमेशन सिस्टीम, लॅन्ड साईडस डिटेक्शन, स्मार्ट ॲग्रिकल्चर सिस्टीम, रोबोट फॉर व्हेरिअस पर्पोज, स्मार्ट बाईक सिस्टीम, सेव्हर क्लिनींग मशीन, वॉटर फिल्टर आदींसह विविध नाविन्यपूर्ण संशोधन मॉडेल्स विद्यार्थ्यांनी प्रदर्शनीत सादर केलेत, त्याची पाहणी तज्ज्ञांनी करुन परिक्षण केले. या प्रदर्शनीमध्ये २३६ संशोधक विद्यार्थ्यांनी सहभागी होवून नवा उच्चांग गाठला.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. पाहुण्यांचे स्वागत डॉ.ए.बी. मराठे व डॉ. प्रशांत ठाकरे यांनी रोपटं देवून केले. प्रास्ताविक डॉ.ए.बी. मराठे यांनी केले. पहिल्या सत्रात डॉ.एन.एल. सारडा यांनी स्टार्टअपवर विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. सत्राचे अध्यक्षस्थान संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास ठाकरे यांनी भूषविले. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची डॉ.एन.एल. सारडा व कु. भावना पंड्या यांनी समपर्क उत्तरे दिलीत. संचालन डॉ. वर्षा नाठार यांनी, तर आभार डॉ. प्रशांत ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाला माजी प्राचार्य व्ही.टी. इंगोले, विभागप्रमुख, शिक्षक, संशोधक, विद्यापीठ व महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २१ एप्रिलला प्रदर्शनी खुली

भौतिकशास्त्र विभागातील स्टार्टअप इंडिया निमित्ताने असलेली प्रदर्शनी सर्वसामान्य नागरिक विशेषतः महाविद्यालये आणि शाळेतील विद्यार्थ्यांसाठी दि. २१ एप्रिल, २०१८ रोजी सकाळी १०.३० ते दु. २.३० वाजेपर्यंत पाहण्यासाठी निःशुल्क खुली राहणार आहे. त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकाच्यावतीने करण्यात आले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २०/०४/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी